# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:13.01.2026** **वार:मंगळवार**

---

1. नावीन्यपूर्ण कल्पना, ऊर्जा आणि दृढसंकल्पासह युवा शक्ती राष्ट्र-उभारणीत अग्रस्थानी असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदींचं प्रतिपादन
2. व्यापक क्षेत्रांमधील द्विपक्षीय करारांच्या रुपानं भारत आणि जर्मनीची धोरणात्मक संबंधांना बळकटी
3. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन 28 जानेवारीपासून, अर्थमंत्री 1 फेब्रुवारीला अर्थसंकल्प सादर करणार
4. देशात यंदा रब्बी पीक लागवडीत चांगली वाढ आणि
5. महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार

**<u>पंतप्रधान</u>**

नावीन्यपूर्ण कल्पना, ऊर्जा आणि दृढसंकल्प यासह युवाशक्ती राष्ट्र-उभारणीत अग्रस्थानी असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल नवी दिल्ली इथं विकसित भारत युवा नेता संवाद कार्यक्रमाच्या समारोप सत्राला संबोधित करत होते. 2047मध्ये देशाच्या स्वातंत्र्याला शंभर वर्षं पूर्ण होतील, तो आजच्या युवकांच्या आयुष्यातला सर्वात महत्त्वाचा कालखंड असेल असंही पंतप्रधानांनी अधोरेखित केलं. ही सुवर्णसंधी आहे. जगभरात निर्माण होत असलेल्या संधींचा लाभ भारतीय युवकांनी घ्यावा, यासाठी केंद्र सरकारकडून कौशल्य विकासाच्या क्षेत्रात सुधारणा केल्या जात असल्याची माहिती मोदी यांनी दिली.  युवकांची क्षमताही पुढील काळात देशाची क्षमता ठरेल आणि त्यांचं यश भारताला यशाच्या नव्या उंचीवर नेईल, असंही पंतप्रधानांनी नमूद केलं. युवा नेता संवाद हा ऐतिहासिक आणि अद्वितीय उपक्रम असून तो अगदी थोड्या अवधीत मोठं व्यासपीठ बनला आहे, या उपक्रमानं युवकांना देशाच्या विकासात थेट सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे, असंही पंतप्रधान यावेळी म्हणाले.....

**साल 2047 में, जब हमारी आजादी के 100 साल होंगे, वहां तक की यात्रा भारत के लिए भी अहम है, और यही वो समय है, जो आपके जीवन में भी सबसे महत्वपूर्ण है, । आपका सामर्थ्य, भारत का सामर्थ्य बनेगा, आपकी सफलता, भारत की सफलता को नई ऊंचाइयां जरूर देगी। मैं आप सभी को विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग में सहभागिता के लिए बहुत-बहुत बधाई देता हूं।**

यावेळी पंतप्रधानांनी या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आयोजित प्रदर्शनाला भेट देऊन युवा नेत्यांशी संवाद साधला आणि त्यांचे विचार, त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना जाणून घेतल्या. 9 ते 12 जानेवारी या काळात पार पडलेल्या विकसित भारत युवा नेता संवादमध्ये देशभरातील 50 लाखांहून अधिक युवक विविध पातळ्यांवर सहभागी झाले.

**<u>भारत-जर्मनी</u>**

संरक्षण, व्यापार, तंत्रज्ञान अशा व्यापक क्षेत्रांमधील द्विपक्षीय करारांच्या रुपानं भारत आणि जर्मनीनं आपले धोरणात्मक संबंध अधिक दृढ केले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्यात काल गुजरातमध्ये गांधीनगर इथं झालेल्या उच्चस्तरीय शिष्टमंडळ चर्चेनंतर दोन्ही देशांनी आपली धोरणात्मक भागीदारी बळकट केली. द्विपक्षीय भागीदारीला 25 वर्षपूर्ण झाल्यानिमित्त मर्झ यांनी केलेल्या भारत दौऱ्यात 19 सामंजस्य करार

करण्यात आले, तसंच संरक्षण, तंत्रज्ञान आणि स्वच्छ ऊर्जा या क्षेत्रात आठ महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या. भारत आणि युरोपीय महासंघ यांच्यातील मुक्त व्यापार करार निष्कर्षाप्रत पोहोचावा यासाठी आपला पाठिंबा असल्याचा पंतप्रधान मोदी आणि चान्सलर मर्झ यांनी पुनरुच्चार केला. या महिना अखेरपर्यंत हा मुक्त व्यापार करार होण्याची शक्यता असल्याचं मर्झ यांनी सूचित केलं.

**सर्जिओ गोर**

भारत आणि अमेरिका यांच्यात सध्या सुरू असलेल्या व्यापार करारासंबंधीच्या वाटचाघाटींमध्ये दोन्ही देश सक्रियपणे पुढाकार घेत आहेत, असं अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जिओ गोर यांनी म्हटलं आहे. व्यापार करारासंबंधीच्या बोलण्यांची फेरी आज पार पडणार असल्याच्या पार्श्र्वभूमीवर गोर यांनी हे वक्तव्य केलं. दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये व्यापार हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचंही ते म्हणाले.

**अर्थसंकल्प**

2026-27 या आर्थिक वर्षासाठी केंद्रीय अर्थसंकल्प 1 फेब्रुवारीला लोकसभेत मांडला जाणार आहे. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी काल दिल्लीत पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन एक तारखेला लोकसभेत सकाळी 11 वाजता अर्थसंकल्पाचं वाचन सुरु करतील, असं त्यांनी सांगितलं. 28 जानेवारीला राष्ट्रपतींच्या अभिभाषणानं अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात होईल. अधिवेशनाचं पहिलं सत्र 13 फेब्रुवारीपर्यंत चालेल. दुसरं सत्र 9 मार्चते 2 एप्रिल या कालावधीतपार पडणार आहे. त्यामुळे या अधिवेशनात सभागृहांमधे अर्थपूर्ण चर्चा होतील, असं केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं.

**महापालिका प्रचार सांगता**

महाराष्ट्रातल्या 29 महानगरपालिका निवडणूकीसाठीच्या प्रचाराचा आज अखेरचा दिवस आहे. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात सर्वच पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी जाहीर सभा घेतल्या. तर ठिकठिकाणच्या उमेदवारांनी मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी, रोड शो, कोपरा सभा घेत मतदारांना आकर्षित करायचा प्रयत्न केला. मुंबई महानगर पालिकेसाठी महायुतीची जाहीर सभा काल शिवाजी पार्कवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत पार पडली. मुख्यमंत्र्यांनी काल नवी मुंबईतल्या ऐरोलीमध्येही जाहीर सभा घेतली. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी काल ठाण्यात जाहीर सभा घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांसाठी काल पुण्यात जाहीर सभा घेतल्या, तसंच रोड शोच्या माध्यमातूनही प्रचार केला.

**भोगी-लोहरी**

सूर्याचं उत्तरायण आणि शेतात कापणीला आलेली पिकं या आनंदाप्रीत्यर्थ देशात आज सगळीकडे लोहरी हा सण साजरा केला जात आहे. सायंकाळी शेकोटी पेटवून, गाणी गात, पारंपारिक पदार्थांचा आस्वाद घेत लोहरीचा सण पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशात साजरा केला जातो. महाराष्ट्रातही आज भोगीचा उत्साह पाहायला मिळत आहे. हा सण परस्पर प्रेम आणि एकतेचा संदेश देतो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना आज आणि उद्या देशात लोहरी, मकर संक्रांत, बिहू आणि पोंगल अशा नावांनी साजऱ्या होणाऱ्या सणांच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**रब्बी लागवड-एनओए**

यंदा देशात रब्बी पीक लागवडी खालील क्षेत्रात चांगली वाढ झाली आहे. 9 जानेवारीपर्यंत 6 कोटी 44 लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर रब्बीच्या पेरण्या झाल्याची माहिती केंद्रीय कृषी मंत्रालयानं दिली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत त्यामध्ये 17 लाख हेक्टरपेक्षा जास्त वाढ झाली आहे. 3 कोटी 33 लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रात गहू, तर 21 लाख

हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर भात पेरणी झाली आहे. 1 कोटी 36 लाख हेक्टर क्षेत्रात कडधान्यांची, तर 55 लाख हेक्टरवर तृणधान्यांची लागवड झाली आहे. तर 96 लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रात गळीत, अर्थात तेलबियांची लागवड करण्यात आली आहे.

**<u>डीआरडीओ चाचणी</u>**

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थाच डीआरडीओनं विकसित केलेल्या MPATGM अर्थात रणगाडाविरोधी अत्याधुनिक छोटेखानी क्षेपणास्त्राची यशस्वीरीत्या चाचणी घेण्यात आल्याची माहिती काल देण्यात आली. फिरत्या लक्ष्यावर हल्ला करण्याची या क्षेपणास्त्राची क्षमता आहे. महाराष्ट्रात अहिल्यानगर इथल्या केके रेंजेसवर ही चाचणी घेण्यात आली. हे क्षेपणास्त्र अत्याधुनिक स्वदेश तंत्रज्ञान प्रणालींनी सुसज्ज आहे.

**<u>परेड रंगीत तालीम</u>**

येत्या प्रजासत्ताक दिनी कर्तव्य पथावर होणाऱ्या संचलन सोहळ्याची येत्या 23 तारखेला पूर्ण गणवेशात रंगीत तालीम होणार आहे. या रंगीत तालमीचे नागरिकांना मोफत पास देण्यात येणार असल्याची घोषणा संरक्षण मंत्रालयानं केली आहे. www.aamantran.mod.gov या संकेतस्थळावर किवा आमंत्रण मोबाईल ॲपवर 15 आणि 16 तारखेला हे पास विनामूल्य उपलब्ध होतील.

**<u>ट्रंप इराण</u>**

इराणशी व्यावसायिक संबंध राखणाऱ्या देशांना अमेरिकेकडून ठोठावण्यात येणाऱ्या आर्थिक दंडांना सामोरं जावं लागेल असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी जाहीर केलं आहे. इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणशी व्यवसाय करणाऱ्या कोणत्याही देशानं अमेरिकेबरोबर व्यवसाय केल्यास त्या देशाला अतिरिक्त 25 टक्के कराची रक्कम तत्काळ प्रभावानं लागू केली जाईल असंही त्यांनी आपल्या समाज मध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. इराण बरोबर व्यापाराचे सर्व पर्याय अमेरिकेकडून खुले आहेत परंतु यामध्ये राजनैतिकतेला मुख्य प्राधान्य असेल असं व्हाईट हाऊसकडून आलेल्या विधानात म्हटलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये, काल रात्री नवी मुंबईत झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने यूपी वॉरियर्सचा नऊ खेळाडू राखून पराभव केला.

***याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं***

***नमस्कार.***